# जेव्हा दुबई भारताचा भाग होण्याच्या उंबरठ्यावर होती !

**लेखक : सॅम दालरिम्पल**

मंडळी, आज आपल्याला दुबईत किंवा आखाती देशात जाण्यासाठी पासपोर्ट आणि व्हिसाची गरज असते. पण एके काळी हा सगळा प्रदेश ब्रिटिशांच्या भारतीय साम्राज्याचा भाग होता, हे आता सांगूनही पटणार नाही. पण तसं होतं हे नक्की. सॅम दालरिम्पल यांच्या BBC वरील लेखाने या विषयाला तोंड फोडले आणि बऱ्याच गोष्टी उजेडात आल्या. 'जेव्हा दुबई भारताचा भाग होण्याच्या उंबरठ्यावर होती' या आपल्या लेखात ते लिहितात-



१९६७ मध्ये घेतलेला दुबईतील समुद्रकिनाऱ्याचा फोटो

१९५६ चा हिवाळा होता. 'द टाइम्स'चे प्रतिनिधी डेव्हिड होल्डन बहारिनच्या बेटावर आले होते. बहारिन तेव्हा ब्रिटिशांच्या अंमलाखाली होतं. डेव्हिड होल्डन यांना अनपेक्षितपणे राणी व्हिक्टोरियाच्या सन्मानार्थ साजऱ्या होणाऱ्या समारंभाला उपस्थित राहावं लागलं. ब्रिटिश भारत आणि अरबी आखाती प्रदेशांमधील खोलवर रुजलेले संबंध

यामुळे अधोरेखित झाले. त्यानंतर ते आखातात दुबई, अबु धाबी आणि ओमान; जिथे जिथे गेले, तिथे तिथे त्यांना अपेक्षेप्रमाणे ब्रिटिशांच्या अंमलाखालील भारताच्या खुणा आढळल्या.

होल्डन लिहितात, "ब्रिटिशांच्या राजवटीचा इथे बराच प्रभाव आहे. इथली परिस्थिती जरा विसंगत आणि कालबाह्य असल्यासारखी वाटते. ब्रिटिश वसाहतीप्रमाणे इथे बेअरा म्हणजे नोकर सर्व काम करतात, कपडे धुणारा धोबी आहे आणि चौकीदारही आहे. रविवारी जेवणामध्ये पारंपरिक अँग्लो-इंडियन 'करी' चा समावेश असतो." राजस्थानात शिक्षण घेतलेल्या ओमानच्या सुलतानांचं अरबीपेक्षा उर्दू भाषेवर अधिक प्रभुत्व होतं. तत्कालीन क्वायती साम्राज्यातील, म्हणजे आत्ताच्या पूर्व येमेनमधील सैनिक जुन्या हैदराबाद संस्थानच्या सैन्याच्या गणवेशात वावरत होते.


**कसं होतं भारताच्या प्रभावाखालील आखात ?**

स्वत: एडनच्या गव्हर्नरच्या शब्दात सांगायचं तर, "येथील काळ सत्तर वर्षांपूर्वी गोठला असावा, अशी इथली परिस्थिती होती. इथे सत्तर वर्षांपूर्वी ब्रिटिशांचं साम्राज्य होतं, राणी व्हिक्टोरिया सिंहासनावर होती, नाटककार गिल्बर्ट आणि संगीतकार सुलिवन यांची ताजी कला नावाजली जात होती. तर रूडयार्ड किपलिंग हा प्रस्थापित धारणा कशा निरर्थक आहेत, ते उघड करत होता. इथल्या घड्याळाचे काटे अजूनही त्याच काळात अडकून पडल्यासारखा ब्रिटिशांचा विलक्षण प्रभाव इथे होता. दिल्ली ते दक्षिण अरेबियन किनाऱ्यापर्यंतचा हैदराबाद मार्गे असणारा दुवा प्रचंड मजबूत होता." एडन ते कुवेतपर्यंत,

ब्रिटिशांच्या अंमलाखाली असलेल्या अरबस्थानच्या प्रदेशाचा राज्यकारभार दिल्लीतून चालवला जात होता.

**भारताचा अरबदेशांमध्ये प्रभाव**


आज जरी ही बाब मोठ्या प्रमाणात विस्मृतीत गेलेली असली, तरी विसाव्या शतकाच्या सुरुवातीला अरबी द्वीपकल्पाचा जवळपास एक तृतियांश भूप्रदेश ब्रिटिश इंडियन साम्राज्याचा भाग होता. ब्रिटिशांच्या इंडियन पोलिटिकल सर्व्हिसकडून तिथे शासन चालवलं जात असे. तिथे भारतीय सैन्य देखरेख करायचं आणि ते भारताच्या व्हाइसरॉयच्या अखत्यारित काम करत होते. १८८९ च्या 'इंटरप्रिटेशन ॲक्ट' अंतर्गत हा सर्व ब्रिटिश अंमलाखालील प्रदेश कायदेशीररित्या भारताचा भाग मानला जात असे.



**एडनचं बंदर - १९३१ मध्ये महात्मा गांधी इथे आले होते, तेव्हा त्यांना दिसलं होतं की काही तरुण अरब भारतीय राष्ट्रवाद्यांच्या बाजूने होते.**

भारतीय अर्ध-स्वायत्त संस्थानांच्या यादीची सुरुवात अबू धाबीने होत असे. व्हाइसरॉय लॉर्ड करझन यांनी ओमानलाही भारतातील संस्थान मानण्याची शिफारस केली होती. एडन (आजचे येमेन) येथे भारतीय पासपोर्ट दिले जात असत. येमेन हे भारताचे सर्वात पश्चिमेकडील बंदर म्हणून कार्यरत होते आणि मुंबई प्रांताचा भाग म्हणून त्याचे प्रशासन चालवले जात होते. तथापि, त्यावेळीही, ब्रिटिश किंवा भारतीय जनतेतील फार कमी लोकांना ब्रिटिश राजवटीच्या या अरबी

विस्ताराची माहिती होती. इंडियन एम्पायरचा संपूर्ण विस्तार दर्शविणारे नकाशे अत्यंत गुप्ततेने प्रकाशित केले जात असत आणि ओटोमन किंवा नंतर सौदींना चिथावणी मिळू नये म्हणून अरबी प्रदेशांना सार्वजनिक कागदपत्रांमधून वगळण्यात आले होते.



आजच्या येमेनमधील अगदी पश्चिमेला असलेल्या एडनपर्यंत भारतीय पासपोर्ट दिले जात होते

रॉयल एशियाटिक सोसायटीचा एक व्याख्याता उपहासाने म्हणाला होता: "जसा एखादा मत्सरी शेख त्याच्या आवडत्या पत्नीला बुरख्याखाली झाकून ठेवतो, त्याचप्रमाणे ब्रिटिश अधिकारी अरब राज्यांमधील परिस्थितीबद्दल इतके गूढ राखतात, की संशयी लोकांना तिथे काहीतरी भयानक घडत आहे, असेच वाटेल."

**बदलते राजकारण**

१९२० नंतर भारतीय राष्ट्रवादी भारताची एक साम्राज्यवादी रचना म्हणून नव्हे तर महाभारताच्या भूगोलात रुजलेले एक सांस्कृतिक स्थान म्हणून कल्पना करू लागले. लंडनला यामध्ये सीमा नव्याने आखण्याची संधी दिसली. १ एप्रिल १९३७ रोजी, साम्राज्याच्या अनेक फाळण्यांपैकी पहिली फाळणी झाली आणि एडनला भारतापासून वेगळं करण्यात आलं.

सहावे किंग जॉर्ज यांचा एक तारसंदेश सार्वजनिकपणे वाचण्यात आला :

*"गेल्या १०० वर्षांपासून एडन हा ब्रिटिश इंडियन प्रशासनाचा अविभाज्य भाग होता. माझ्या इंडियन साम्राज्याशी असलेला एडनचा राजकीय संबंध आता संपुष्टात येईल आणि एडन आता माझ्या साम्राज्यातील एक वसाहत होईल."*

तथापि, गल्फमधील इतर प्रदेश अजूनही इंडियन गव्हर्नमेंटच्या ताब्यात होते. पर्शियन आखात, आणखी एक दशकभर भारत सरकारच्या अखत्यारीतच राहिलं.

**ब्रिटिशांनी भारताकडून असं घेतलं आखात**

भारत स्वतंत्र झाल्यानंतर ब्रिटिशांच्या भारतीय साम्राज्याची राजकीय स्थिती, भूप्रदेशाच्या सीमा, राज्यकारभार कसा असणार याचादेखील विचार ब्रिटिश करतच होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत किंवा पाकिस्तानला 'पर्शियन आखातावर नियंत्रण ठेवू दिलं जाईल का', याची थोडक्यात चर्चा ब्रिटिश अधिकाऱ्यांनी केली होती.

तरीदेखील तेहरानमधील ब्रिटिश उच्चायुक्तालय किंवा दूतावासातील एका सदस्यानं, 'पर्शियन आखाताबद्दल भारत सरकारला फारसा रस नाही.' या दिल्लीतील अधिकाऱ्यांमध्ये असलेल्या 'स्पष्ट एकमताबद्दल' आश्चर्य व्यक्त केलं होतं.

आखातातील ब्रिटिश रहिवासी विल्यम हे यांनी त्याबाबत म्हटलं होतं,

"आखाती अरबांशी व्यवहार करण्याची जबाबदारी भारतीय किंवा पाकिस्तानी लोकांकडे सोपवणे नि:संदेहपणे अयोग्य ठरले असते". त्यामुळे अखेर, १ एप्रिल १९४७ ला दुबईपासून ते कुवेतपर्यंतचे आखाती देश ब्रिटिश भारतीय साम्राज्यापासून वेगळे झाले.

भारताला स्वातंत्र्य मिळण्याच्या आणि भारताची फाळणी होण्याच्या काही महिने आधी हे घडलं होतं.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, काही महिन्यांनी भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी शेकडो संस्थानांचं विलीनीकरण करण्याचं ठरवलं. मात्र, त्यावेळेस आखातातील अरब देश किंवा संस्थानं त्यामध्ये नव्हती. जर हा लहानसा प्रशासनिक निर्णय झाला नसता, तर पर्शियन आखातातील देश किंवा संस्थानं, स्वातंत्र्यानंतर भारत किंवा पाकिस्तानचा भाग बनले असते. ज्याप्रमाणे भारतीय उपखंडातील प्रत्येक संस्थानाच्या बाबतीत घडलं, तसंच आखातातील देश किंवा संस्थानांच्या बाबतीत देखील घडलं असतं.

ब्रिटिश पंतप्रधान क्लेमेंट ॲटली यांनी भारताला ब्रिटिश साम्राज्यातून स्वतंत्र करण्याच्या वेळेसच अरब प्रदेशातून ब्रिटिशांनी माघार घ्यावी, असा प्रस्ताव मांडला होता. मात्र त्याला प्रचंड विरोध झाला. त्यामुळे पुढची २४ वर्षं ब्रिटीशांनी आखातावर आपला ताबा ठेवला.

**ब्रिटनच्या नियंत्रणातून आखाताची सुटका**

त्या वेळचं ब्रिटिश ‘अरेबियन राज’ किंवा आखाती प्रदेश आता भारताच्या व्हाईसरॉयऐवजी व्हाईटहॉलच्या म्हणजे ब्रिटनच्या अखत्यारित होता.

आखाती प्रदेशाचे अभ्यासक पॉल रिच यांच्या शब्दात सांगायचं तर,

“ज्याप्रमाणे गोवा ही पोर्तुगीजांच्या भारतातील अस्तित्वाची शेवटची खूण होती किंवा पाँडिचेरी (आजचं पुद्दुचेरी) हा फ्रेंचांच्या भारतातील वसाहतीचा शेवटचा भाग होता.

त्याचप्रमाणे आखात हा ब्रिटिशांच्या भारतीय साम्राज्यातून माघार घ्यायचा शेवटचा प्रदेश होता.''

आखातातील अधिकृत चलन अजूनही भारतीय रुपया होतं. 'ब्रिटिश इंडिया लाईन' ही शिपिंग कंपनी हेच वाहतुकीचं सर्वात सोपं साधन होतं. आणि अजूनही, इंडियन पोलिटिकल सर्व्हिसमध्ये कारकीर्द घडवलेल्या 'ब्रिटीश रेसिडेंट्स'चं ३० अरब संस्थानांवर शासन होतं.

१९७१ मध्ये शेवटी ब्रिटिश आखातातून बाहेर पडले. सुएझच्या पूर्वेकडील वसाहती सोडण्याच्या निर्णयाचा एक भाग म्हणून त्यांनी आखाती प्रदेशातून माघार घेतली.

डेव्हिड होल्डन यांनी जुलैमध्ये लिहिलं होतं, ''ब्रिटिशांच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या सुवर्णकाळानंतर पहिल्यांदाच, आखाताच्या सभोवतालचे सर्व प्रदेश ब्रिटिशांच्या हस्तक्षेपाशिवाय किंवा ब्रिटिशांच्या संरक्षणाशिवाय स्वत:चा मार्ग ठरवण्यासाठी स्वतंत्र असतील. हा ब्रिटिश राजवटीचा शेवटचा भाग आहे. तो काही दृष्टीने आकर्षक असला तरी त्याचा शेवट आला आहे.''

## अरबांना भारतीयांबद्दल काय वाटतं?

ब्रिटिश साम्राज्याचा अस्त झाल्यानंतर उदयास आलेल्या सर्व राष्ट्रवादी विचारांमध्ये, ब्रिटिशांच्या भारतीय साम्राज्याबरोबर असलेले संबंध पुसून टाकण्यात, आखाती देश सर्वाधिक यशस्वी झाले आहेत. बहारीनपासून ते दुबईपर्यंत, ब्रिटनशी असलेले भूतकाळातील संबंध आठवले जातात, मात्र दिल्लीतून चालवण्यात आलेला राज्यकारभार

किंवा शासनाची आठवण काढली जात नाही. राजेशाही जिवंत ठेवण्यासाठी प्राचीन काळातील सार्वभौमत्वाचं मिथक अत्यंत महत्त्वाचं आहे. मात्र तरीदेखील लोकांच्या मनातील खासगी आठवणी कायम आहेत. विशेषकरून आखाती प्रदेशात झालेल्या अकल्पनीय वर्गीय उलथापालथीच्या आठवणी.

आखाती प्रदेशाबाबतचे तज्ज्ञ पॉल रिच यांनी २००९ मध्ये कतारमधील एका वृद्ध गृहस्थाची आठवण सांगितली. त्या वृद्धानं पॉल यांना सांगितलं की, ते तेव्हा  सात किंवा आठ वर्षांचे होते. तोपर्यंत त्यांनी संत्रं कधीही पाहिलं नव्हतं. कुतूहलापोटी त्यांनी ते फळ चोरलं, तेव्हा त्यांना एका ब्रिटिश अधिकाऱ्याच्या भारतीय नोकरानं मारहाण केली होती. त्या प्रसंगाचं वर्णन करताना त्या वृद्धाला अजूनही राग येत होता. ते म्हणाले, “आमच्या तरुणपणी भारतीयांना आखातात विशेषाधिकार मिळालेले होते. मात्र आज परिस्थिती बदलल्याचं, उलटल्याचं पाहून मला खूप आनंद होतो. आज भारतीय लोक आखाती प्रदेशात नोकर म्हणून काम करण्यास येत आहेत.”

कधीकाळी दुबई ब्रिटिशांच्या भारतीय साम्राज्याची एक छोटी चौकी होती. तिथे तोफांची सलामी दिली जात नव्हती. आज मात्र दुबई मध्यपूर्वेचं एक चकाकतं, प्रचंड यशस्वी असं केंद्र आहे.

दुबईत राहणाऱ्या लाखो भारतीय आणि पाकिस्तानी लोकांपैकी काहीच जणांना माहीत असेल, की त्यांना जसे जयपूर, हैदराबाद किंवा बहावलपूर वारशाच्या स्वरूपात मिळालं, तसंच कच्च्या तेलानं समृद्ध असलेला आखाती प्रदेश देखील वारशाच्या स्वरूपात मिळाला असता.

ब्रिटिश साम्राज्याच्या संध्याकाळी, नोकरशाहीनं गुपचूप घेतलेल्या एका निर्णयामुळे हा दुवा तुटला. आज त्याचे फक्त प्रतिध्वनीच राहिले आहेत. विचार करा, जर आज आखाती देश आणि तिथले तेलसाठे भारताच्या किंवा पाकिस्तानच्या मालकीचे असते तर जगाचा इतिहास आणि भूगोल किती बदलला असता.

मूळ लेख : https://www.bbc.com/news/articles/cgq3wlp22j9o

§§§

---

**लेखक : सॅम दालरिम्पल,** 'शॅटर्ड लँड्स: फाईव्ह पार्टिशन्स अँड द मेकिंग ऑफ मॉडर्न एशिया' या पुस्तकाचे लेखक आहेत.

**रूपांतर** : **यशश्री पुणेकर**, शैक्षणिक संदर्भ गटात सहभागी.

**इ-मेल :** yashashreegpunekar@gmail.com

***(कळीचे शब्द :- इतिहास, ब्रिटिश इंडियन एम्पायर, ब्रिटिश राज, दुबई, आखाती प्रदेश, History, British Indian Empire, British Raj, Dubai, Gulf)***

*शैक्षणिक संदर्भ अंक ११२ जून-जुलै २०१८, अंक ११३ ऑगस्ट-सप्टेंबर २०१८ तसेच अंक ११९ ऑगस्ट-सप्टेंबर २०१९ हे वैज्ञानिक दृष्टिकोन विशेषांक होते.*

*हे आणि संदर्भचे इतरही अंक संदर्भ सोसायटीच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. जरूर वाचा.*

***www.sandarbhsociety.org***